# मुकी बिचारी कुणी हाका...मरणाकडे....

-प्रा.संतोष कुलकर्णी,
पशुवैद्यक महाविद्यालय,उदगीर.

नुकतेच रेल्वे अपघातात पंचावन्न गायींचा मृत्यू झाल्याचे वृत्त सर्वांना कळले. मन हेलावून गेले. संबंधित पशुपालकांचीही मानसिक अवस्था सांगणारे वृत्ते व वृत्तांत वाचनात आले. अर्थातच त्यांची मनःस्थिती गंभीर व क्लेशदायक असणार. ते या धक्क्यातून सावरतीलही व शिकतीलही. काही महिन्यांपूर्वी एका ट्रक अपघातात साठ मेंढ्या मेल्याचेही वृत्त आले होते. राजस्थानातही मोरांचा अपघाती मृत्यू झाल्याचे वृत्त होते. काही वर्षांपूर्वी रासायनिक विषारी टाकाऊ पदार्थ खाण्यात आल्याने शंभराहूनअधिक मेंढ्या मेल्या होत्या. या सर्व घटना विचार करायला लावणा-या आहेत. खरा प्रश्न आहे तो हकनाक जीव गमावलेल्या गरीब मुक्या जिवांचा.

वास्तविक पाहता, पशुपालन व्यवसायाच्या माध्यमातून या गरीब, मुक्या व अबल प्राण्यांचे वन्यावस्थेतून नागरी जीवनात आणल्यामुळे संरक्षण झाले. वन्य, हिंस्र पशू व छोटे मोठे आजार यांपासून या जिवांची सुटका मानवाने केली असे शास्त्र सांगते. हे समर्थन सत्य मानायचे असेल तर अशा घटना रोखण्यासाठी काळजी घेतली गेली पाहिजे. हा व्यवसाय करणारे पशुपालक दूर-दूरावरून येवून जनावरांचे कळप पोसत असतात. हेही गरीबच आहेत; अजाणच आहेत. पण म्हणून त्यांची काहीच जबाबदारी नाही असे मानणे व आर्थिक नुकसान झाल्यामुळे होणारी यांबद्दल सहानुभूती दाखवणे अन्याय्य नाही का? जनावरे जगण्याच्या हक्कास पात्र नाहीत? न्याय ही गोष्ट जनावरांच्या बाबतीत आपण लागू करणार नाहीत काय? उपयुक्ततावादाचा किती विपर्यास आपण करणार? वन्य पशूंपासून व आजारांपासून मुक्त करून फायदे लाटून या जनावरांना मरायला सोडण्याचा हक्क मानवास आहे काय? याचा विचार कोण करणार? गायींच्या मरण्या-मारण्याचे धार्मिक, सामाजिक, सोयीस्कर राजकारणही वेळप्रसंगी केले जाते. पण खरा प्रश्न सोडवणार कोण? आचार्य विनोबा भावेंनी भाकड गायींना मारले जावू नये यासाठी गोवर्धन केंद्रे काढली. गाडगेबाबांनीही असे कार्य केले. परंतु भाकड गायींबद्दल अर्थशास्त्रीय घोळ घातला जातो. तोही खोटा असल्याचे विनोबांनी केवळ शेणापासून होणा-या खत, गोबर गॅस यांसारख्या फायद्यांद्वारे सिद्ध केले होते. पण त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होते. माणसाच्या फायद्यासाठी हितासाठी पशुपालन जरूर केले गेले पाहिजे. हे एक प्रकारे सृष्टीतले सिंबायोसिसच आहे. पण मानवाने या सिंबायोसिसचे नियम पाळले पाहिजेत. सुसंस्कृत जीव असल्यामुळे ती जबाबदारी माणसाची अधिक आहे. यासंबंधात नुसत्या संघटना उभारून चालेल काय? या संघटनांच्या प्रेरणा तपासल्या गेल्या पाहिजेत. परवाच्या अपघाताच्या संबंधात या संघटनांनी कोणते पाऊल उचलले? अपघात जरी असला तरी आणि अपघातास जबाबदार असलेले पशुपालक गरीब आणि अशिक्षित असले तरी एवढ्या गायींचा केवळ

अपघाताने मृत्यू ही पशुप्रधान देशाला लाजवणारी घटना नाही काय? हा अपघात क्षम्य ठरतो काय? संबंधित पशुपालकांच्या मन:स्थितीचे वर्णन सांगणारे रकाने वाचणा-यांनी हाही विचार करावा की त्या गायींच्यावर केवढा मानसिकआघात झाला असेल! ऐन अपघातावेळी मरणा-या गायींची अवस्था काय झाली असेल! कोण धांदल झाली असेल! जनावरांना मन नाही असे मानले तरी जिवाची भीती नसते असेही मानायचे काय? वास्तविक पाहता, मानवाइतके प्रगल्भ नसले तरी प्राण्यांनाही मन असते; त्याही मनाची घालमेल होत असते. भावना असतात. मेलेल्यांत जिवंत असलेल्या गायींची वासरे असतील किंवा जिवंत वासरांच्या माता असतील. त्यांच्या दु:खाचे काय? हा प्रश्न हास्यास्पद आहे? पशुपालकांच्या व्यावसायिक नुकसानीबद्दलच फक्त शोक करणार काय? एक खरे की,अशा घटनांत आर्थिक नुकसान तर होतेच. केवळ पशुपालकांचेच नाही तर देशाचेच होते. देशातील पशुधनाचे होते.मग याला वरकरणी कोणीच जबाबदार नाही म्हणून व हा अपघात होता, असा विचार करून गप्प बसायचे का?

जनावरांच्या आयुष्याचे हे असेच चालणार असेले तर ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. धार्मिक कारणांखातर, अंधश्रद्धेपोटी जनावरांचे बळी देण्याबाबत माणसाच्या न्यायालयात '... हस्तक्षेप करता येत नाही...' व '... लोकाज्ञेपुढे काही चालत नाही...' म्हणून मूग गिळले जातात ही शरमेची गोष्ट आहे. कधी शास्त्रीय - अर्थशास्त्रीय, कधी धार्मिक- तर कधी अपघाती अशी विविध कारणे सांगून जनावरांचे आयुष्य कुस्करून टाकण्याचे अधिकार माणसाने स्वत:कडे घेतले आहेत. नाही म्हणायला काही संघटनांच्या दबावाने काही नियम केले गेले आहेत. पण ते कागदावरच अधिक शोभून दिसावेत यासाठी. आजही अजाण,अशिक्षित पशुपालक आपले जनावरांचे कळपच्या कळप रस्त्यावर सोडून मजेत रेंगाळत असतात. रहदारीने वैतागलेला, वेळ व भान नसलेला एखादा माणूस खुशाल त्यांच्यावरून आपले वाहन घेवून जातो. क्वचित प्रसंगी थातुरमातुर नुकसानभरपाई देवून मोकळा होतो. पण त्या जनावरांच्या वेदनांचा विचार हास्यास्पद ठरतो. अशा वेळी संघटनाही कामाला येत नाहीत. पशूंच्या सहानुभूतीचा दावा करणा-या संघटनांचे मांसाहारी कार्यकर्ते व पदाधिकारी फक्त प्रसिद्धीला महत्व देतात (अर्थात सन्माननीय अपवाद वगळता). उलट नको तिथे आडमुठ्या धोरणामुळे पशु-अनुकंपेसंबंधीच्या कार्याला बदनामीचा, कुचेष्टेचा विषय बनवतात. या संघटना फक्त 'योजना राबवतात'. सांगता येईल असे ठोस कार्य अजून आमच्या देशात इतरां देशांप्रमाणे झालेले नाही. निदान या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मांसाहार सोडण्याची शर्त स्वत:पुढे ठेवावी. त्यानेसुद्धा अनेक जीव वाचणार आहेत. पण त्याबाबतीतले गांभीर्य मानले तर! विनोबांचे अनुयायी कै.आचार्य देशपांडे यांनी देवनारच्या कत्तलखान्यासमोर मरेपर्यंत सत्याग्रह केला. त्याची दखल सोडा आठवण किंवा माहिती तरी किती जणांना आहे, याचा शोध घेतला तर नैराश्य येण्यासारखी परिस्थिती आहे. पण ते असो.

या अपघाताच्या निमित्ताने निदान चौकशी व्हावी एवढी अपेक्षा आहे. चौकशी करणा-यांनीही काही पर्याय सुचवावेत जेणे करून असे अपघात घडणार नाहीत व पशुधनाचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार नाही. पशुपालक अडाणी असल्यामुळे या अपघातात मेलेल्या गायींचा विमा उतरवलेला असण्याची शक्यता कमीच आहे. पण तरी तो उतरवला असेल तर त्याचा मोबदला त्या पशुपालकांना देण्यात येवू नये याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी. त्यांच्यावर दु:खाचा पहाड कोसळला असला तरी निदान एवढी शिक्षा या पशुपालकांना व्हावी. विमा उतरवलेला नसेल तर ते सुटलेच आहेत. एरवीही त्यांच्याजवळ एकही गाय शिल्लक नाही असे नाही. त्यांच्या रोजीरोटीवर बेतले आहे असे नाही.

भारत हा कृषिप्रधान तसा पशुप्रधानही देश आहे याची जाणीव असेल तर या गोष्टीची गंभीर दखल घ्यायलाच हवी.

*********************************************************************************

प्रा.संतोष कुलकर्णी,
सहयोगी प्राध्यापक, शरिरक्रियाशास्त्र व जीवरसायनशास्त्र विभाग,पशुवैद्यक महाविद्यालय,उदगीर.दूरध्वनी:५८०४६